**महाराष्ट्र शासन**
**महसूल व वन विभाग, मादाम कामा मार्ग,**
**हुतात्मा राजगुरु चौक, मंत्रालय, मुंबई-४०००३२**
**दुरध्वनी क्र. ०२२-२२०४८२४७ Email ID : dokh.rfd@maharashtra.gov.in**

---

**क्रमांक:-गौखनि-५१अ/०९२३/प्र.क्र.३८१/ख-२** **दिनांक :-१३ फेब्रुवारी, २०२४**

**विषय : गौण खनिज- गडचिरोली**
सन २०१८-१९ करीता मौजे शिवणी-२, ता. आरमोरी, जि. गडचिरोली या वाळूगटाची जप्त केलेली १/४ रक्कम परत मिळणेबाबत.
**मे. एम.ओ.व्ही. कंट्रोल्स अँड इन्सट्रयुमेन्टस**

**शासन ज्ञापन:**

सन २०१८-१९ करीता मौजा शिवणी-२ वैनगंगा नदी ता. आरमोरी हा घाट रू.०१,८५,४७,५००/- इतक्या सर्वोच्च बोलीस मे. एम.ओ.व्ही. कंट्रोल्स अँड इन्सट्रयुमेन्टस यांना मंजूर करण्यात आला होता. लिलावधारक यांनी लिलावाच्या रक्कमा विहित वेळेत शासन जमा न केल्यामुळे महसूल व वन विभाग, शासन निर्णय दिनांक ०३.०१.२०१८ मधील १० (अ) (१) मधील तरतुदीनुसार लिलावाच्या सर्वोच्च बोलीच्या १/४ रक्कम जप्त करुन वाळू गटाचा ताबा लिलावधारक यांना देता न आल्याने वाळूगटाची ३/४ परत करण्याबाबत शासन पत्र दिनांक ०६.०१.२०२० अन्वये जिल्हाधिकारी, गडचिरोली यांना कळविले.

**०२.** शासन पत्र दिनांक ०६.०१.२०२० अन्वये व्यथित होऊन लिलावधरक यांनी मा. मुंबई उच्च न्यायालय, नागपूर खंडपीठ येथे रिट याचिका क्रमांक ३७८४/२०२१ दाखल केली. सदर याचिकेत मा. उच्च न्यायालयाने दिनाक १३.०७.२०२३ च्या आदेशान्व ये मौजा शिवणी-२ रेतीघाटाची जप्त करण्यात आलेली १/४ रक्कम परत करण्याचे आदेश दिले आहेत. सबब, मौजा शिवणी-२, ता. आरमोरी, जि. गडचिरोली या रेतीघाटाची जप्त करण्यात आलेली लिलावाची १/४ रक्कम रु. ४६,३६,८७५/- लिलावधारकास परत करण्याचा शासनाने निर्णय घेतला आहे.

**०३.** सबब, लिलावधारक लिलावधारक मे. एम.ओ.व्ही. कंट्रोल्स अँड इन्सट्रयुमेन्टस यांनी लिलावाची संपुर्ण रक्कम प्रत्यक्षात शासनाकडे जमा केल्याची व यापुर्वी लिलावाची जप्त केलेली १/४ रक्कम अदा केलेली नाही, याची खातरजमा करुन घेण्याच्या अटीवर रक्कम रु.४६,३६,८७५/- (रुपये सेहेचाळीस लाख छत्तीस हजार आठशे पंच्याहत्तर फक्त) इतकी अदा करण्यास या शासन ज्ञापनाद्वारे शासन मान्यता देण्यात येत आहे.

**०४.** या बाबीवर होणारा खर्च सन २०२३-२४ या आर्थिक वर्षाकरीता "०८५३-अलोहयुक्त खाणी व धातुशास्त्रीय उद्योग" १०२-खनिजाबाबत सवलत फी व स्वामित्वधन,९००, अलोहयुक्त खाणकाम व धातुशास्त्रीय उद्योग-वजा परतावे (००) (०१) वजा परतावे (०८५३ ००८६) या लेखाशिर्षाखाली उपलब्ध असलेल्या अंदाजपत्रकीय तरतुदीमधून खर्ची टाकून भागविण्यात यावा.

**०५.** सदर शासन ज्ञापन, वित्त विभागाच्या क्र.विअप्र-२०१९/प्र.क्र.२०/२०१९/विनियम, दिनांक ०८.०८.२०१९ रोजीच्या शासन निर्णयान्वये वित्तीय अधिकार नियम पुस्तिका,१९७८, भाग-२ नुसार महसूल व वन विभागास प्रदान करण्यात आलेल्या वित्तीय अधिकारानुसार निर्गमित करण्यात येत आहे.

सदर ज्ञापन महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संकेतांक २०२४०२१३१५११३०२३१९ असा आहे. हे ज्ञापन डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नांवाने,

SADANAND GOVIND MOHITE

Digitally signed by SADANAND GOVIND MOHITE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=REVENUE AND FORESTS DEPARTMENT, 2.5.4.20=9bd008875b6a3a9fddad3e55fe0328df13a27221cb2bbc67abd0155f914efc01, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=6590E2301450C474B246074049174C79201BCAD9E5EB15E8F21C282EAEFEDA38, cn=SADANAND GOVIND MOHITE
Date: 2024.02.13 15:20:18 +05'30'

**( सदानंद गो. मोहिते )**
**कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

**जिल्हाधिकारी, गडचिरोली**

**प्रत:-**

१) विभागीय आयुक्त, नागपूर
२) प्रधान महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता) २, नागपूर.
३) प्रधान महालेखापाल -(लेखापरीक्षा)२, नागपूर.
४) जिल्हा कोषागार अधिकारी,गडचिरोली
५) कार्यासन अधिकारी (कार्यासन ब-१), महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
६) निवडनस्ती (कार्यासन-ख-२)